**महाराष्ट्र शासन**

क्र. नपप्रसं २०१७/न.प.संवर्ग/कार्यासन-६/प्र.क्र.९२ /4376

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
शासकिय परिवहन सेवा इमारत,३ मजला,
सर पोचखानवाला रोड, वरळी,
मुंबई - ४०० ०३०
दिनांक -१३.१०.२०१७.

13 OCT 2017

प्रति,

मुख्याधिकारी,
सर्व नगरपरिषद.

**विषय :- महाराष्ट्र राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्गातील कर्मचाऱ्याकडे संवर्ग पदाचा कार्यभार देणेबाबत.**

राज्यातील नगरपरिषदेमधील दैनंदिन काम व विकास कामांचे सुसूत्रीकरण व्हावे, त्यांच्या सेवा शर्ती वेतनश्रेणी यांच्यात समानता असावी व विहीत शैक्षणिक अर्हता पात्र जबाबदार अधिकारी नगरपरिषद प्रशासनात उपलब्ध व्हावेत म्हणून शासनाने मधील दि. ११.१.२००७ च्या शासन निर्णयान्वये खालील प्रमाणे एकूण ६ महाराष्ट्र नगरपरिषद कर्मचारी राज्यस्तरीय संवर्ग स्थापन केलेले आहेत.

| अक्र. | संवर्गाचे नांव |
|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद अभियान्त्रिकी सेवा |
| | अ)स्थापत्य . |
| | ब)विद्युत . |
| | क)संगणक. |
| २ | महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियान्त्रिकी सेवा |
| ३ | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल व लेखापरिक्षक सेवा |
| ४ | महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा |
| ५ | महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा |
| ६ | महाराष्ट्र नगरपरिषद नगररचनाकार आणि विकास सेवा |

राज्यस्तरीय संवर्गातील कार्यरत कर्मचारी यांचेकडे तो ज्या संवर्गातील आहे त्या संवर्ग पदाचा कार्यभार त्याच्याकडे देणे आवश्यक आहे. परंतू मुख्याधिकारी हे संवर्गातील कर्मचारी यांच्याकडे संवर्गातील पदाचा कार्यभार न

देता संवर्ग व्यतिरिक्त दुय्यम कामाचा कार्यभार देत असल्याचे व संवर्ग कर्मचारी कार्यरत असताना संवर्गबाह्य कर्मचाऱ्याकडे संवर्ग पदाचा कार्यभार देत असल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचारी यांचेकडे तो ज्या संवर्गातील आहे त्या संवर्ग पदाचा कार्यभार त्याच्याकडे देण्यात यावा. संवर्गव्यतिरिक्त इतर पदाचा कार्यभार संवर्ग कर्मचाऱ्याकडे देण्यात येऊ नये. जर संवर्गातील कर्मचाऱ्याकडे संवर्गव्यतिरिक्त इतर पदाचा कार्यभार दिल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मुख्याधिकारी हे शिस्तभंग कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

13/10/2017

(दगा मोरे)
**उप संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.**